20 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरूंच्या हस्ते हॅकॅथॉन स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कल्पक संशोधनाच्या सादरीकरणासाठी पुणे येथील इनोव्हेशन फाउंडेशनने 'इनोव्हेट यू ·टेकाथॉन' आयोजित केली आहे. या हॅकॅथॉन स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.



कोल्हापूर : 'इनोव्हेट यु टेकाथॉन' या हॅकॅथॉन स्पर्धेच्या पोस्टरचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि इनोव्हेशन फाउंडेशनचे अध्यक्ष कल्पेश यादव यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यापीठाच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय स्तरावरील हॅकॅथॉन स्पर्धेत सहभाग घेऊन कल्पक संशोधन प्रकल्प सादर करावेत, यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांची इनोव्हेशन फाउंडेशनचे अध्यक्ष कल्पेश यादव यांनी भेट घेतली. त्यांना सकारात्मक प्रतिसाद देत या उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिले.

पुण्यातील एआयएसएसएमएस येथे हॅकॅथॉन स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वाचे आयोजन येत्या २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणीला सुरुवात झाली आहे. राज्यभरातील सर्व विद्यापीठांतील, तसेच संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात. विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यासाठी दहा फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी (innovateyou.in) या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन यादव यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठात ग्राहक जागृती कार्यक्रम

कोल्हापूर ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या (एनएसएस) सहकार्याने राजाराम महाविद्यालय आणि गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयातर्फे एनएसएसचे महाविद्यालयस्तरीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. त्यामध्ये ग्राहक हक्क व कायदा जनजागृती उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. प्रा. सिद्धार्थ राक्षसे यांनी प्रास्ताविक केले. प्रकल्प अधिकारी प्रा. सूरज सोनवणे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख वक्ते अखिल भारतीय ग्राहक पंचायत कोल्हापूर महानगरचे अध्यक्ष कमलाकर बुरांडे यांनी 'ग्राहक संरक्षण कायदा आणि ग्राहकांचे हक्क व अधिकार' याबाबतची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन बुरांडे, सहसंघटक प्रशांत चौगुले, सचिव विनायक वाळवेकर यांनी केले. यावेळी प्रा. जयंत खानापूरकर, प्रा. देवळालकर, राजश्री पोवार, कल्पना पाटोळे आदी उपस्थित होते.

20 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दैनंदिन भत्त्यातील वाढ खेळाडूंचे मनोबल वाढवणार

## आता ५०० रूपयांपेक्षा जास्त भत्ता वाढवून देण्याची मागणी : वाढीमुळे खेळाडूंना मिळेल पौष्टिक आहार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना सुरूवातीला २० रूपये दैनंदिन भत्ता मिळत होता, सध्या ३५० भत्ता असून त्यात वाढ करण्याचा ठराव अधिसभेत मंजूर करण्यात आला. ही गोष्ट स्वागतार्ह आहे, परंतू प्रशासनाने इतर विद्यापीठाप्रमाणे महागाईनुसार दरवर्षी खेळाडूंच्या भत्त्यात वाढ करून सध्या ५०० पेक्षा जास्त भत्ता देण्याची मागणी पुढे येत आहे.

तरुण भारत संवाद



विद्यापीठातून

शालेय जीवनापासूनच अनेक विद्यार्थी खेळात तरबेज असतात. अनेकांची परिस्थिती नसताना पाल्याच्या इच्छेखातर पालक कर्ज काढून क्रीडा स्पर्धेसाठी पाल्याला पाठवतात. खेळाडूंच्या विजयाने खेळाडूबरोबर कॉलेज व विद्यापीठाचे नाव राज्यासह देशाच्या नकाशावर कोरले जाते. खेळाडूंना लागणारे डायट, चहा, नाष्टा, जेवण, पोट भरून मिळाले तर ते स्पर्धेत चांगले खेळू शकतात. म्हणूनच विद्यापीठाने खेळाडूंच्या भत्त्यात दरवर्षी वाढ केली तर त्यांना स्पर्धेदरम्यान आरोग्याची काळजी घेता येईल.

> **खेळाडूंना सुविधा मिळण्यासाठी भत्त्यात वाढ आवश्यक**
>
> वरिष्ठ गटातील खेळाडू विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करतात. बाहेरगावी खेळायला गेल्यावर पौष्टिक आहार मिळावा, प्रवास व राहायची व्यवस्था चांगली होण्यासाठी विद्यापीठाच्या भत्त्यात वाढ होण्याची गरज आहे.
>
> **-डॉ. बाबासाहेब उलपे**, प्राचार्य, केएमसी कॉलेज, क्रीडा प्रशिक्षक

विद्यापीठाच्या अधिसभेत खेळाडूंना ग्रेस गुण मिळाले पाहिजेत, यासाठी अनेकांनी आवाज उठवला. हा ठराव मंजूरही करण्यात आला. दुसरी अधिसभा स्थापन झाली तरी यावर अद्याप निर्णय घेतला नसल्याने नाराजीचा सूर आहे. क्रीडा स्पर्धांच्या वेळापत्रकानुसार नियोजन करून खेळाडूंच्या परीक्षा वेगळ्या घेतल्या जातात. ही खेळाडूंच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट आहे. खेळाडूंना सर्वोत्परी सुविधा देत असल्याचा दावा प्रशासन करीत आहे. परंतु मिळणाऱ्या भत्त्यात पौष्टिक आहार घेता येत नसल्याचे खेळाडू व प्रशिक्षकांचे म्हणने आहे. खेळाडूंना अनेक सुविधांसह आर्थिक मदत पुरवण्याची गरज आहे.

### खेळाडूंच्या अडचणी जाणून घेण्याची गरज

वर्षभरात विद्यापीठातील खेळाडू अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धांसाठी इतर राज्यांमध्ये जावून सुवर्णपदकही मिळवली. खेळाडू यश मिळवून आल्यानंतर विद्यापीठ व महाविद्यालय प्रशासनाने त्यांचा सत्कारही केला. परंतू येणाऱ्या अडचणी कोणीही जाणून घेतल्या नसल्याचे खेळाडूंचे म्हणणे आहे. क्रीडा संचालकांनी खेळाडूंबरोबर येवून खेळाडूंना दिलासा द्यावा, अशी मागणीदेखील खेळाडूंकडून होत आहे.

विद्यापीठाच्या स्थापनेपासून दैनंदिन भत्त्यात झालेले बदल

विद्यापीठाच्या स्थापनेवेळी खेळाडूंना २० रूपये भत्ता होता. काळानुरूप ६० वरून ८० अन् पाच वर्षापुर्वी १५० भत्ता तर अलीकडे ३५० रूपयें भत्ता दिला जातो. अधिकार मंडळांनी खेळाडूंच्या भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JAN 2025

तरुण भारत

# लालबहादूर शास्त्री कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**कोलोली :** सातारा येथील लाल बहादूर शास्त्री कॉलेजमध्ये आयोजीत करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम प्रसंगी योगेश्वर पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लाल बहादूर शास्त्री कॉलेज चे माजी.प्राचार्य व शिवाजी विद्यापीठ कौन्सिल सदृय सातारा केंद्र प्रमुख डॉ .आर.व्ही.शेजवळ होते. शालेय शिक्षणाला अवांतर वाचनाची जोड देणे भविष्याच्या दृष्टीने काळाची गरज आहे . वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे जीवनात वाचनाला महत्व द्यावे.आजचा विद्यार्थी हा उद्याचा सक्षम नागरीक आहे त्यादृष्टीने विद्यार्थी दशेतच त्याचा पाया भक्कम करणे गरजेचे आहे.असेही त्यानी यावेळी सांगितले. यावेळी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचे पुणेचे सदस्य सुनील शिंदे यांच्या वतीने विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. संजय पाटील, योगेश्वर संजय पाटील कोतोलीकर, राम नाईक, सोनदेव बेलेकर कळेकर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.